# भंडारा जिल्ह्यातील रेती वाहतुकी करिता वाहन नोंदणीकृत करणेबाबत जाहिरात.

भंडारा जिल्ह्यातील रेतीघाट लिलाव सन 2017 - 18 अंतर्गत रेतीघाटाचे लिलाव करण्यात आले आहे. सदर रेतीघाटातुन रेती वाहतुक सुरू होणार आहे व जिल्ह्यात कुठेही अवैध रेती वाहतुक होवू नये व या व्यवसायात असलेले वाहतुकदार यांना नाहक त्रास होवू नये या करिता रेती वाहतुकदार संघटना भंडारा यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांच्याकडे सादर केलेल्या निवेदनानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून भंडारा जिल्ह्यातील रेती वाहतुक करणा-या सर्व वाहनाची नोंदणी अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सर्व ईच्छुक वाहनधारकांनी भंडारा जिल्ह्यातील रेती वाहतुकी करिता आपले वाहन नोंदणीकृत करण्याकरीता मा. जिल्हाधिकारी भंडारा यांचे नावे अर्ज करावा. अर्जामध्ये खालील बांबीचा समावेष असावा.

1. रिकामा वाहनाचे वजन ( टनमध्ये)
2. भरलेल्या वाहनाचे वजन ( टनमध्ये)
3. वाहनाचे अधिभार क्षमता ( टनमध्ये)

अर्जासह खालील कागदपत्र जोडण्यात यावे.

1. वाहनमालकाचे आधारकार्ड
2. टक्स भरल्याची पावती
3. विमा कागदपत्र
4. वाहन परवाना कागदपत्र
5. वाहनाचा योग्यता प्रमाणपत्र

अर्जासह उपरोक्त कागदपत्रे वैध व तपासणी अंती योग्य असल्याचा शेरा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी भंडारा याच्याकडून वाहनमालकांनी करुन घ्यावा व सदर शेरा प्राप्त झाल्यानंतर सेतू कार्यालय भंडारा येथे येवून उपरोक्त सर्व कागदपत्राच्या scan copy (soft copy) सह सेतू कार्यालय भंडारा येथे येवून आपले वाहन नोंदणीकृत करावे.वाहन नोंदणी फ़ी प्रती वाहन रु. 100 आहे, वाहन नोंदणीकृत होताच सदर फ़ी भरून त्याची पोच पावती घ्यावी.

आदेशान्वये